* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* नांदेड * परभणी * हिंगोली

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक २८७ * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * बुधवार दि.१८ फेब्रुवारी २०२६ | * पाने-४

## भारत आणि फ्रान्समध्ये विशेष जागतिक धोरणात्मक भागीदारी

### इमॅन्युएल मॅक्रोन यांच्या बैठकीनंतर मोदींची घोषणा

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली –** फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन तीन दिवसीय भारत भेटीवर आले असून आज ते मुंबईत आहेत. त्यानिमित्ताने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीही आज मुंबईत आले. या दोन्ही वरिष्ठ नेत्यांमध्ये द्विपक्षीय बैठक झाली. या बैठकीत दोन्ही देशातील व्यापारवृद्धीवर चर्चा करण्यात आली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माध्यमांना संबोधित केले. यावेळी त्यांनी भारत आणि फ्रान्स यांच्यातील 'विशेष जागतिक धोरणात्मक भागीदारी'ची घोषणा केली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, ''भारत आणि फ्रान्स भारतात माउंट एव्हरेस्टच्या उंचीवर उडण्यास सक्षम असलेले जगातील एकमेव हेलिकॉप्टर तयार करतील आणि ते जागतिक स्तरावर निर्यात केले जातील. भारत-फ्रान्स भागीदारीला कोणत्याही सीमा नाहीत. या दोन्ही देशातील भागीदारी खोल महासागरांपासून सर्वात उंच पर्वतांपर्यंत पसरलेली असेल. जग अनिश्चिततेच्या काळातून जात असताना, भारत-फ्रान्स भागीदारी जागतिक स्थिरतेसाठी एक शक्ती बनेल, असे ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, भारत-फ्रान्सच्या द्विपक्षीय संबंधात संरक्षण, स्वच्छ ऊर्जा, अवकाश आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानातील सहकार्यावर भर दिला जाईल. त्यांनी नमूद केले की हा उपक्रम उद्योग, स्टार्टअप आणि एमएसएमई यांना जोडेल. विद्यार्थी आणि संशोधकांमधील देवाणघेवाणीला प्रोत्साहन देईल आणि फ्रान्ससोबत संयुक्त करारासाठी नवीन केंद्रे स्थापन करेल. भारत-फ्रान्स नवोन्मेष वर्ष २०२६ निमित्त मॅक्रॉन यांचा हा चौथा भारत दौरा आहे आणि मुंबईला त्यांचा पहिलाच दौरा आहे. हा दौरा दोन्ही राष्ट्रांमधील वाढत्या धोरणात्मक आणि तांत्रिक भागीदारी मजबूत करेल. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आणि द्विपक्षीय संबंधांना ''उल्लेखनीय आणि अद्वितीय'' असं वर्णन केलं. ते म्हणाले की दोन्ही राष्ट्रांनी त्यांचे संबंध विश्वास, मोकळेपणा आणि महत्त्वाकांक्षेवर आधारित विशेष धोरणात्मक भागीदारीकडे नेण्याचा निर्णय घेतला आहे. मॅक्रॉन यांनी इंडो-पॅसिफिकमधील सहकार्य, तंत्रज्ञान आणि नियम-आधारित व्यवस्थेवर प्रकाश टाकला आणि आयएमईसी कॉरिडॉर, कृत्रिम बुद्धिमत्ता सहकार्य आणि आंतरराष्ट्रीय सौर आघाडी यासारख्या संयुक्त उपक्रमांचा उल्लेख केला, असे नमूद करून की गेल्या आठ वर्षांत दोन्ही देशांनी एकत्रितपणे नवीन मार्ग शोधले आहेत.

## दादांनी घेतलेले निर्णय दादांसोबतच गेले; सुप्रिया सुळेंचा विलीनीकरणाच्या चर्चेला पूर्णविराम

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली –** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी अजित पवारांनी घेतलेले निर्णय अजित पवारांसोबतच गेल्याचे नमूद करत राष्ट्रवादीच्या दोन्ही गटाच्या विलीनीकरणाच्या वादाला पूर्णविराम दिला. दादांनी घेतलेले निर्णय दादांसोबतच गेले. माझा भाऊ राहिला नाही. त्यामुळे आता त्या चर्चांना काही अर्थ उरत नाही, असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, यावेळी त्यांनी पार्थ पवारांना मुंढवा भूखंड घोटाळ्यात देण्यात आलेल्या कथित क्लीनचिटवर भाष्य करण्यासही नकार दिला.

सरकारने पुण्यातील मुंढवा भूखंड घोटाळ्याच्या चौकशीसाठी महसूल सचिव विकास खारगे यांची समिती नियुक्त केली होती या समितीने आपला अहवाल सोमवारी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना सुपूर्द केला. या अहवालात पार्थ पवार यांना अभय देत या व्यवहारासाठी मदत करणाऱ्या २ सरकारी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची शिफारस करण्यात आली आहे. सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी या प्रकरणी नवी दिल्लीत पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी सदर अहवाल वाचल्याशिवाय त्यावर भाष्य करणे चुकीचे असल्याचे स्पष्ट केले.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, प्रस्तुत अहवाल अद्याप जाहीर झाला नाही. त्यामुळे सूत्रांच्या अहवालावर मी काहीही बोलणार नाही. एक लोकप्रतिनिधी म्हणून असे अहवाल प्रत्यक्षात वाचल्याशिवाय मी प्रतिक्रिया देऊ शकत नाही. असे अहवाल गोपनीय असतात. त्यामुळे ते बाहेर येत नाहीत. त्यातही एखादा अहवाल प्रसिद्ध झाला तर ते वाचल्याशिवाय मी प्रतिक्रिया देत नाही. पण हे प्रकरण उजेडात आल्यानंतर मी त्यात पार्थ पवारांचे नाव आल्याचे टीव्ही चॅनलवर पाहिले होते. त्यानंतर मी स्वतःहून त्याला फोन केला. त्याला या प्रकरणाची माहिती विचारली. त्यावर तो म्हणाला होता की, आत्या मी काहीही चुकीचे केले नाही. यावर मी तुम्हाला सविस्तर सांगेन. त्याच्या या विधानावर मी विश्वास ठेवला. आत्या, मावशी, आई म्हणून आमच्या घरातील मुलांनी कोणतेही चुकीचे काम करू नये अशी माझी सर्वांकडून अपेक्षा आहे. आमच्या घरात असेच संस्कार दिले जातात. हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. या देशात कोर्टाचे निर्णय मान्य करायचे असतात. त्याचे काही नियम असतात. त्यामला मला वाटते की, तो अहवाल व कोर्टाची फायनल ऑर्डर येईपर्यंत कोणत्याही न्यायालयीन प्रकरणावर बोलणे योग्य ठरणार नाही, असे त्या म्हणाल्या.

## अजितदादांच्या विमान अपघातातील ब्लॅक बॉक्सवर आगीचा दुष्परिणाम, एएआयबीची माहिती

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** अजित पवार यांच्या विमान अपघाताला जवळपास तीन आठवडे पूर्ण होत आले आहेत. या अपघाताच्या प्राथमिक अहवालाची सर्वांनाच प्रतीक्षा आहे. मात्र ज्या ब्लॅक्स बॉक्सच्या आधारे हा तपास होणार आहे, तो जळालेल्या अवस्थेत असल्यामुळं तपासात मर्यादा येत असल्याचं समोर आलं होतं. त्यासाठी हा ब्लॅक बॉक्स आता परदेशी पाठवण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. याचदरम्यान एअर एक्सीडेंट इन्वेस्टिगेशन ब्युरोने एक महत्वाची माहिती दिली आहे.

विमानातील दोन्ही रेकॉर्डरवर उच्च तापमानाचा (आगीचा) दुष्परिणाम झाला आहे. विमानातील दोन्ही रेकॉर्डर जास्त वेळ आगीत राहिल्यामुळे त्यावर गंभीर परिणाम झाला आहे. त्यामुळे विमानातील दोन्ही रेकॉर्डरमधील डेटा रिकव्हर करण्याचे काम सुरू आहेत. ज्या देशात विमान बांधणी झाली आहे, त्या देशातील अधिकृत प्रतिनिधींकडून या प्रकरणी मदत मागितली आहे, अशी माहिती एअर एक्सीडेंट इन्वेस्टिगेशन ब्युरोने दिली आहे. त्यामुळे आता या ब्लॅक बॉक्सचं पुढे काय होणार, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## सुनेत्रा पवारांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट; अजित पवारांच्या विमान अपघाताची सीबीआय चौकशीची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आणि त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली. त्यातून सावरत आता उपमुख्यमंत्री पदाची सूत्रे अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी हाती घेतली आहेत. इतर सर्व सुरळीत सुरू झाले असले तरी अजित पवारांचा अपघात होता की घातपात यावर अद्यापही शंका उपस्थित केल्या जात आहेत. त्यातच सुनेत्रा पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या इतर नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. याबद्दल पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी माहिती दिली आहे.



अजितदादांच्या विमान अपघाताची चौकशी सीबीआयमार्फत केली जावई, अशी मागणी करण्यासाठी आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली, अशी माहिती सुनील तटकरे यांनी दिली. प्रसारमाध्यमांशी बोलताना ते म्हणाले, मी स्वतः त्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, ज्येष्ठ मंत्री हसन मुश्रीफ आणि पार्थ पवार अशा सर्वांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. अजितदादांच्या अपघाती मृत्यू झाला त्याबाबत आम्ही मुख्यमंत्र्यांना एक निवेदन दिले आहे. या पूर्ण प्रकरणाची सीबीआयच्या माध्यमातून चौकशी करावी, यशही मागणी आम्ही केलेली आहे. तसे निवेदन आम्ही दिलेले असल्याची माहिती तटकरे यांनी दिली आहे.

पुढे बोलताना सुनील तटकरे म्हणाले, निवेदनाची दखल घेत राज्य सरकार उद्या केंद्र सरकारकडे अजितदादांच्या अपघाती मृत्यूची चौकशी करण्याची मागणी करणार आहे. तसा पत्रव्यवहार केला जाईल. मुख्यमंत्री या नात्याने देवेंद्र फडणवीस यांच्याकडून तशी पावले उचलली जातील, असेही तटकरे यांनी यावेळी सांगितले आहे. त्यामुळे आता हे प्रकरण सीबीआयकडे गेले तर कोणती नवी माहिती समोर येते याकडे लक्ष असणार आहे.

## अजित पवारांचा मृत्यू अपघाती वाटत नाही; काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला संशय

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी अजित पवारांच्या विमानाचा ब्लॅकबॉक्स जळाच्या मुद्यावर संशय व्यक्त केला आहे. अजित पवारांच्या अपघाताविषयी वेगवेगळ्या शंकाकुशंका व्यक्त केल्या जात आहेत. या प्रकरणी ब्लॅकबॉक्स खराब झाला किंवा त्यातून काहीही माहिती प्राप्त होत नाही असे म्हटले जाते तेव्हा निश्चितच दाल में कुछ काला हैं असा संशय येतो, असे ते म्हणालेत.

अजित पवार यांचे गत २८ जानेवारी रोजी बारामतीत झालेल्या एका विमान अपघातात मृत्यू झाला. तेव्हापासून या अपघाताविषयी संशय व्यक्त केला जात आहे. अनेक नेत्यांनी हा अपघात नसून, घातपात असल्याचा दावा केला आहे. त्यात आता काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांची भर पडली आहे. विजय वडेट्टीवारांनी मंगळवारी या प्रकरणी बोलताना अजित पवारांचा मृत्यू अपघात वाटत नाही असा दावा केला. ते म्हणाले, अजित पवारांचा मृत्यू अपघाती आहे की घातपात आहे याविषयी देशभरात खूप चर्चा सुरू आहे. अजित पवारांचा मृत्यू हा काही अपघात वाटत नाही. याविषयी ज्या काही शंका उपस्थित झाल्यात त्यात काही प्रमाणात तथ्य वाटते. ब्लॅक्सबॉक्स खराब झाला आहे किंवा त्यातून काही माहिती प्राप्त होत नाही असे समोर येते तेव्हा त्याचा अर्थ दाल में कुछ काला हैं असा लावला जातो, असे ते म्हणाले.

## हर्षवर्धन सपकाळांकडून शिवप्रेमींची दिलगिरी

### भाजपचा खोडसाळपणा म्हणत वक्तव्याचा अर्थही समजावला

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** राज्यात शिवजयंतीची जल्लोष आणि उत्साहात तयारी सुरू असून शिवप्रेमी, शिवभक्त तयारीला लागले आहेत. मात्र, दोन दिवसांपूर्वी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची तुलना शिवाजी महाराजांबद्दल केल्याच्या वक्तव्यावरुन चांगलाच वाद सुरू झाला. भाजप नेते, आमदारांकडून हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर टीका करत काँग्रेसचा खरा चेहरा हाच आहे, काही विशिष्ट समुदायाच्या व्होट बँकेसाठी हर्षवर्धन सपकाळ असं बोलतात असेही सत्ताधाऱ्यांनी म्हटले. मात्र, माझ्या वक्तव्याचा विपर्यास केला, भाजपने जाणीवपूर्वक खोडसाळपणा केल्याचं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. तसेच, आपल्या वक्तव्याने काही शिवप्रेमी बांधवांच्या भावना दुखावल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्त करतो, असेही सपकाळ यांनी म्हटले.

हर्षवर्धन सकपाळ यांनी शिवाजी महाराजांबद्दल गौरवोद्गार काढताना टिपू सुलतानच्या कार्याचेही कौतुक केले होते. तसेच, शिवाजी महाराजांची तुलना टिपू सुलतानसोबत केल्याचं दिसून आलं. मात्र, भाजपने खोडसाळपणा करत चुकीच्या पद्धतीने माझे वक्तव्य पसरवल्याचे सांगत आपल्या वक्तव्याबद्दल हर्षवर्धन सपकाळ यांनी शिवप्रेमीप्रती केली दिलगिरी व्यक्त केली आहे.



दोन दिवसांपूर्वी हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना टिपू सुलतान सोबत केली या वक्तव्यामुळे राज्यभरात गदारोळ निर्माण झाला होता. त्यानंतर, हर्षवर्धन सपकाळ यांना धमक्याही मिळाल्या होत्या तर काही शिवप्रेमी थेट हर्षवर्धन सपकाळ यांच्या निवासस्थानी सुद्धा दाखल झाले होते. त्या अनुषंगाने हर्षवर्धन सपकाळ यांनी फेसबुक पोस्ट करत ''भाजपचा तीव्र शब्दात निषेध करत त्यांच्या गलिच्छ व खोडसाळपणामुळे काही शिवप्रेमी बांधवांच्या भावना दुखावल्या गेल.या त्याबद्दल मी मनःपूर्वक खेद व्यक्त करतो, माझ्या शब्दाचा गैरवापर केल्याबद्दल शिवप्रेमीं प्रति दिलगिरी व्यक्त करतो व कुणाच्याही भावनांना ठेच पोहोचण्याचा माझा हेतू नव्हता'' अशा प्रकारची फेसबुक पोस्ट सपकाळ यांनी केली आहे. तसेच, आपल्या पोस्टमध्ये अंभागातील काही ओळीही दिल्या आहेत. भले तरि देऊं कासेची लंगोटी । नाठाळाचे माथी हाणू काठी । असे तुकाराम महाराजांच्या अभंगातील ओळीतून सपकाळ यांनी संदेश दिलाय.

## मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणी अहवाल महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सादर

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांना पुण्यातील मुंढवा जमीन घोटाळाप्रकरणी चौकशी समितीकडून क्लीन चिट देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणात पार्थ पवार यांना मोठा दिलासा मिळाल्याचे मानले जात आहे. या जमीन व्यवहार प्रकरणात पार्थ पवार यांची स्वाक्षरी नसल्याने जमीन खरेदीशी त्यांचा थेट संबंध नाही, असा निष्कर्ष याप्रकरणाच्या चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या विकास खरगे यांच्या समितीने काढला आहे. त्यामुळे पार्थ पवार यांना अभय मिळाल्याचे सांगितले जात आहे. विकास खरगे यांच्या समितीने जमीन व्यवहाराशी संबंधित कागदपत्रांची छाननी, महसूल विभागातील नोंदींची तपासणी तसेच संबंधित अधिकारी आणि पक्षकारांचे जबाब नोंदवलेत. या अहवालात जमीन हस्तांतरण प्रक्रिया, झोन बदल, नोंदणीतील त्रुटी तसेच महसूल अधिकाऱ्यांची भूमिका याबाबत सविस्तर माहिती देण्यात आल्याचे समजते.

या जमीन घोटाळ्यातून क्लीन चिट मिळाल्यामुळे पार्थ पवार यांचा राज्यसभेवर जाण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे सांगितले जाते. अजित पवार यांच्या निधनानंत सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा दिला होता. त्या जागी पार्थ पवार यांची वर्णी लागेल, असे सांगितले जात होते. मात्र, मुंढवा जमीन घोटाळ्यामुळे पार्थ पवार यांची प्रतिमा डागाळली होती. परिणामी त्यांना थेट राज्यसभेवर पाठवल्यास भाजपच्या नैतिकतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होण्याची शक्यता होती. मात्र, खरगे समितीने क्लीन चिट दिल्याने पार्थ पवार यांचा राज्यसभेवर जाण्याचा मार्ग मोकळा मानले जात आहे. पुण्यातील सुमारे १८०० कोटी रुपये किंमतीची महार वतन जमीन ३०० कोटी रुपयांना पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने खरेदी केल्यावरुन प्रचंड वादंग निर्माण झाला होता. त्यामुळे या प्रकरणाच्या चौकशीसाठी महसूल सचिव विकास खारगे यांची समिती नेमण्यात आली होती. या समितीने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सोमवारी या चौकशीचा अहवाल सादर केला. यामध्ये पार्थ पवार यांचा मुंढवा जमीन व्यवहाराशी संबंध नसल्याचा निष्कर्ष नोंदवण्यात आला आहे. त्याचवेळी दोन सरकार अधिकाऱ्यांच्या विरोधात कारवाईची शिफारस करण्यात आली आहे. आता चंद्रशेखर बावनकुळे हा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर करतील. त्यानंतर हा अहवाल स्विकारायचा की नाही याचा निर्णय होणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

## अजितदादांच्या अपघाताविषयी कुठेच काही होत नाही, ब्लॅकबॉक्स बॉम्बस्फोटापासून सुरक्षित, पण राजकारणापासून नाही -रोहित पवार

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मंगळवारी पुन्हा एकदा अजित पवारांच्या विमान अपघातावर संशय व्यक्त केला आहे. सरकारकडून अजित पवार यांच्या विमान अपघाताचा तपास अतिशय संथ गतीने सुरू आहे. या प्रकरणी कुठेच काही होताना दिसून येत नाही. व्हीएसआर कंपनीही अजून सुरू आहे. विमानाचा ब्लॅकबॉक्स पाऊस, आग, उन व बॉम्बस्फोटांपासून सुरक्षित आहे, पण राजकारणापासून सुरक्षित नाही, असे ते म्हणालेत. दरम्यान, रोहित पवार उद्या पुन्हा पत्रकार परिषद घेऊन त्यांच्याकडे आलेली नवीन माहिती सार्वजनिक करणार आहेत.

रोहित पवारांनी आज येथील एका सेशन कोर्टात हजेरी लावली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, मी माझ्या ईडीच्या केसच्या बाबतीत आज सेशन कोर्टात आलो होतो. याच केसमध्ये अजित पवारांचीही केस आहे. ईओडब्ल्यूने प्रस्तुत प्रकरणात ईडीला सांगितले आहे की, या प्रकरणात कुठेच काही चुकीचे झाले नाही. त्यामुळे हा विषय आमच्यासाठी संपला आहे. पण आश्चर्य पाहा ईडी काही हा विषय सोडत नाही. १३ फेब्रुवारीला अजित पवार जाऊन १५ दिवस झालेत. पण ईडीने राज्य सरकारविरोधात कोर्टात हा विषय उपस्थित करून आम्हाला या प्रकरणाचा तपास अधिक खोलात जाऊन करायचे असल्याचे सांगितले आहे.

आता आम्ही आमचा विषय लढतोय. त्यात आमचाच विजय होईल असा आम्हाला विश्वास आहे. कितीही संघर्ष करावा लागला तरी आम्ही लढत राहू. पण विषय एवढाच आहे की, कोडे कधी - कधी सुटत नाही. आज जे लोक सत्तेत आहेत, त्यांचाही विषय ईडी सोडत नाही हा फार मोठा प्रश्न आहे. आम्हाला असे कळले आहे की, हा विषय २६ जानेवारीला दिल्लीला गेला होता, तेव्हा दिल्लीने या प्रकरणात जे कुणी नेते असतील त्यांना अजिबात न सोडण्याचे सांगितले. त्यावरून या प्रकरणी केंद्र व राज्य सरकारमध्ये विरोधाभास असल्याचे स्पष्ट होते. आम्ही विरोधात आहोत. आम्हाला संघर्ष करावाच लागेल. पण जे सत्तेत आहेत, त्यांची उद्या अडचण होण्याची शक्यता आहे, असे ते म्हणाले.

रोहित पवारांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवारांचे नाव सूचवणाऱ्या ३५ आमदारांचे आभार मानले. तसेच अजित पवारांच्या अपघातावरही पुन्हा एकदा संशय व्यक्त केला. ते म्हणाले, आमच्यासाठी विलीनीकरण व राजकारण या गोष्टी दुय्यम आहेत. आज अजित पवारांच्या बाबतीत प्रॉपर तपास होणे हे महत्त्वाचे आहे. त्यामुळेच आमचा त्यावर फोकस आहे. आज आम्ही विलीनीकरणावर चर्चा करू शकतो. बैठका घेऊ शकतो. पत्रकार परिषदा घेऊन पुरावेही सादर करू शकतो. आमच्याकडे अख्खा फोन भरून मेसेज, व्हिडिओ तथा फोनवर काय बोलणे झाले याचे पुरावे आहेत. पण मी आज त्यावर बोलणार नाही. आमच्यासाठी हा विषय संपला आहे.

मी उद्या ब्लॅकबॉक्ससह इतर मुद्यांवर सखोल पत्रकार परिषद घेणार आहे. ही पत्रकार परिषद आजच घ्यायची होती, पण आज आपल्या राज्यात परदेशातले व देशातले एक मोठे नेते येथे आलेत. आम्ही पत्रकार परिषद घेतली तर त्यांच्याकडे दुर्लक्ष झाले असते. त्यामुळे आम्ही ही पत्रकार परिषद उद्यापर्यंत लांबणीवर टाकली आहे. सरकारकडून अजित पवारांच्या अपघाताचा अतिशय संथ गतीने तपास सुरू आहे. या प्रकरणी कुठेच काही होताना दिसत नाही. व्हिएसआर कंपनी अजूनही ऑपरेशनमध्ये आहे. आम्ही ज्या - ज्या गोष्टी प्रेडिक्ट केल्या होत्या, त्या - त्या सर्व होताना दिसून येत आहेत.

उद्या ते (सरकार) म्हणतील की, विमाचा ब्लॅकबॉक्स बंदच आहे, जळालाच आहे, तो तपासासाठी भारताबाहेर पाठवावा लागेल. सरकारकडून या तपासाकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे आम्ही या प्रकरणी काही अधिकची माहिती मिळते का ते पाहत आहोत.

विमानाचा ब्लॅकबॉक्स हा पावसापासून उन्हापासून, आगीपासून, बॉम्बब्लास्टपासून सुरक्षित आहे, पण राजकारणापासून सुरक्षित नाही. आता यात काय राजकारण सुरू आहे हे आपल्याला पहावे लागेल. खोलात जावे लागले. उद्या या डिटेलमध्ये जाऊन कोणत्या नवीन गोष्टी आमच्यापर्यंत आल्या आहेत त्या आपल्यापुढे मांडल्या जातील, असे रोहित पवार म्हणाले.

# सत्ता, वासना आणि सैतानी साम्राज्य!
## सत्तांधांच्या चेहऱ्यावरील मुखवटे ओरबाडणारी 'एपस्टीन फाईल्स'

जगाला माणुसकी आणि नीतिमत्तेचे डोस पाजणाऱ्या जागतिक महासत्तांच्या आणि बड्या प्रस्थांच्या घरांत किती काळोख दाटला आहे, याचा भीषण पुरावा म्हणजे जेफ्री एपस्टीन फाईल्स. ही केवळ न्यायालयाची कागदपत्रे नाहीत, तर हे आधुनिक जगातील सर्वात मोठ्या सैतानी साम्राज्याचे मृत्युपत्र आहे. कुख्यात उद्योजक जेफ्री एपस्टीन याने आपल्या खासगी बेटावर जे पाप पेरले होते, त्याचे पीक आता जगासमोर येऊ लागले आहे आणि त्यातून समोर येणारी नावे ऐकून जगाचा थरकाप उडाला आहे.

**बेटावरचे नरक आणि लोलिता एक्सप्रेस**

एपस्टीनचे लिटिल सेंट जेम्स बेट म्हणजे निव्वळ एखादी चैनीची जागा नव्हती, तर तो माणुसकीला काळिमा फासणारा एक अड्डा होता. अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण, मानवी तस्करी आणि सत्तेच्या जोरावर सुरू असलेला नंगा नाच तिथे वर्षांनुवर्षे सुरू होता. या सैतानी खेळाला साथ देण्यासाठी वापरले गेले ते लोलिता एक्सप्रेस नावाचे विमान. या विमानाच्या फ्लाइट लॉग्समध्ये नोंद असलेली नावे वाचली की प्रश्न पडतो आपण ज्यांना जगाचे नेते मानतो, ते इतके नीच कसे असू शकतात?

**नावे मोठी, पण कृत्ये छोटी!**

या फाईल्समध्ये कोणाचे नाव नाही? अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष, नामांकित शास्त्रज्ञ, राजपुत्र, हॉलिवूडचे अभिनेते ते जगप्रसिद्ध उद्योजक... सत्तेच्या आणि पैशाच्या शिखरावर बसलेली ही माणसे एका गुन्हेगाराच्या इतकी जवळ कशी होती? ज्यांच्या एका शब्दावर जगाची धोरणे ठरतात, ती माणसे एका अल्पवयीन मुलींच्या तस्करीचा व्यापार करणाऱ्या नराधमाच्या मेजवानीला का हजर होती? हा केवळ योगायोग नाही, तर हे एक संघटित गुन्हेगारी जाळे होते, ज्याला राजश्रय मिळाला होता.

**संशयास्पद मृत्यू आणि दडपशाही**

२०१९ मध्ये जेफ्री एपस्टीनचा तुरुंगात झालेला मृत्यू हा आत्महत्या म्हणून घोषित केला असला, तरी त्यावर कोणाचाही विश्वास नाही. कारण एपस्टीन जिवंत असता, तर अनेक देशांतील सत्ता पालटली असती. तो जिवंत राहणे हे जगातील पॉवरफुल लोकांसाठी धोक्याचे होते. त्यामुळे त्याचा गळा दाबला गेला की त्याला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले गेले, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.

**न्याय की केवळ कागदपत्रे?**

या फाईल्स आता सार्वजनिक झाल्या असल्या तरी, प्रश्न हा आहे की खरोखरच या बड्या धेंडांना शिक्षा होणार का? की सत्तेचा वापर करून पुन्हा एकदा हे प्रकरण दाबले जाणार? पीडित मुलींच्या किंकाळ्या त्या बेटावर वर्षानुवर्षे घुमत होत्या, तेव्हा हे ब्रह्मज्ञानी लोक तिथे मज्जा मारत होते. हे जग आता अधिक सावध झाले पाहिजे. ज्यांच्या हातांत सत्तेची सूत्रे आहेत, त्यांचे पाय मातीचे आणि चारित्र्य डागाळलेले असू शकते, हे एपस्टीन प्रकरणाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

हे पावरफुल लोक जर स्वतःला कायद्यापेक्षा मोठे समजत असतील, तर एपस्टीन फाईल्स हा त्यांच्या अहंकारावर पडलेला घाला आहे. आता गरज आहे ती यातील प्रत्येक गुन्हेगाराला जगाच्या चव्हाट्यावर आणून फासावर लटकवण्याची. अन्यथा, माणुसकीचा हा पराभव कायमचा इतिहासात नोंदवला जाईल.

# 'कलम का बादशाह' नवा मराठी सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला, अभिनेत्री मोनालिसा बागलचा सशक्त कमबॅक !




कायद्याची धार, संविधानाची ताकद आणि अन्यायाविरोधातील जिद्द या सगळ्यांचा थरारक संगम म्हणजे व्हि.एम.भैलुमे निर्मित आणि आनंदकुमार सरवदे दिग्दर्शित नवा मराठी चित्रपट 'कलम का बादशाह'. सत्तेला प्रश्न विचारणारी आणि सामान्य माणसाच्या हक्कांचा आवाज बनणारी ही कथा लवकरच प्रेक्षकांसमोर उलगडणार आहे.

'कलम का बादशाह' हा सिनेमा दीक्षा आणि जय या दोन तरुणांच्या संघर्षमय प्रवासाची सशक्त मांडणी करतो. अन्याय, भीती आणि सत्तेच्या दबावासमोर न झुकता ते संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांचा आधार घेत लढा उभारतात. कायदा हेच त्यांचं शस्त्र ठरतं आणि धैर्य ही त्यांची खरी ताकद. या प्रवासात ते फक्त शत्रूशीच नव्हे, तर समाजातील व्यवस्थात्मक त्रुटींशीही भिडतात, ज्यामुळे हा सिनेमा केवळ थरारक न राहता विचारप्रवर्तक ठरतो.

या चित्रपटात मोनालिसा बागल, यश डिंबळे, आनंद शिंदे आणि जय मोर्या यांच्या प्रमुख भूमिका आहेत. २०२३ मध्ये आलेला सिनेमा 'रावरंभा' नंतर काही काळ पडद्यापासून दूर राहिलेली अभिनेत्री मोनालिसा बागल 'कलम का बादशाह' या चित्रपटातून सुमारे दोन ते तीन वर्षांनंतर पुन्हा एकदा दमदार भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. अभिनयातली प्रामाणिकता, नजरेतून व्यक्त होणाऱ्या भावना आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण ही मोनालिसाची ओळख आहे. सामाजिक आशय असलेल्या आणि वास्तवाशी भिडणाऱ्या भूमिका साकारण्यात ती सातत्याने लक्षवेधी ठरली आहे आणि आता पुन्हा एकदा या सिनेमातून तिला नव्या भूमिकेत पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. विशेष म्हणजे 'कलम का बादशाह' हा चित्रपट हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

या चित्रपटाचे कथा व दिग्दर्शन आनंदकुमार सरवदे यांनी केले असून, निर्माते व्ही. एम. भैलुमे हे आहेत. आर. बी. फिल्म्स प्रॉडक्शन यांच्या बॅनरखाली या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच सिनेमाचे छायाचित्रण मनीष वि. सोनी यांनी सांभाळले असून, पटकथा व संवाद कल्पेश जगताप यांनी लिहिले आहेत.

शक्तिशाली विषय, प्रभावी अभिनय आणि संविधानाच्या मूल्यांवर आधारित आशय यामुळे 'कलम का बादशाह' हा सिनेमा प्रेक्षकांसाठी एक वेगळा आणि थरारक अनुभव ठरणार आहे.

# त्याग आणि बलिदानाचे मूर्तिमंत रूप श्री गुरु तेग बहादूर साहिबजी




श्री गुरु तेग बहादूरजी हे शीख समुदायाचे गुरु होते, ज्यांची शहादत केवळ एका धर्म किंवा समुदायापुरती मर्यादित नसून, संपूर्ण मानवतेसाठी त्याग, धैर्य आणि धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक आहे. एका आध्यात्मिक गुरूंनी अन्याय, अत्याचार आणि धार्मिक दडपशाहीसमोर झुकण्याऐवजी आपले शीश अर्पण केले; मात्र आपल्या तत्त्वांशी कोणतीही तडजोड केली नाही. त्यामुळे त्यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आपल्याला त्या ऐतिहासिक क्षणाची आठवण होणे साहजिकच आहे.

'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा त्याग, बलिदान आणि मानवतेच्या महान कार्याला अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे हिंद- दि-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचे आयोजन २८ फेब्रुवारी व १ मार्चला नवी मुंबई येथील ओवे मैदान, सेक्टर २९, खारघर येथे होत आहे.

श्री. गुरु तेग बहादूर साहिबजी केवळ शीख समुदायातीलच नव्हे, तर भारतीय उपखंडाच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक इतिहासातील एक महान विभूती आहेत. त्यांचे जीवन धैर्य, त्याग, करुणा आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या सर्वोच्च आदर्शांचे प्रतीक आहे. त्यांचा जन्म इसवी सन १ एप्रिल १६२१ रोजी अमृतसर येथे झाला. ते सहावे शीख गुरु, गुरु हरगोबिंद साहिबजी यांचे धाकटे पुत्र होते. बालपणापासूनच त्यांचा स्वभाव गंभीर, शांत आणि आत्मचिंतनशील होता. इतर मुले खेळात रमलेली असताना गुरु तेग बहादूर साहिबजी एकांतात बसून ईश्वरचिंतन व साधनेत आनंद अनुभवत असत. त्यामुळेच पुढे त्यांचे जीवन बाह्य वैभवापेक्षा अंतःशक्ती आणि नैतिक दृढतेचे उदाहरण ठरले.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजींनी बालपणी शस्त्र व शास्त्र या दोन्हींचे शिक्षण घेतले. युद्धकौशल्य, घोडेस्वारी आणि तलवारबाजी यात त्यांनी प्रावीण्य मिळवले; मात्र कधीही हिंसा किंवा सत्तेच्या लालसेकडे त्यांचे मन वळले नाही. धर्म व मानवतेच्या रक्षणासाठीच शस्त्रांचा उपयोग अर्थपूर्ण असतो, हे ते जाणून होते. तरुणपणी त्यांनी दीर्घकाळ ध्यान व तपस्येचे जीवन स्वीकारले. त्यांच्या या वैराग्य व त्यागामुळेच त्यांना 'त्याग मल' असेही म्हटले गेले. हा त्याग संसारापासून पलायन नव्हता, तर अन्यायापुढे कधीही न झुकणारी आत्मशक्ती निर्माण करण्याचा मार्ग होता.

इसवी सन १६६४ मध्ये श्री गुरु तेग बहादूर साहिबजी शिखांचे नववे गुरु झाले. त्या काळात भारतातील सामाजिक व धार्मिक वातावरण अत्यंत तणावपूर्ण होते. तत्कालिन शासकाच्या धोरणांमुळे धार्मिक असहिष्णूता वाढत होती. अनेक ठिकाणी जबरदस्तीने धर्मांतर, मंदिरांचा विध्वंस आणि धार्मिक आस्थांवर कठोर निर्बंध लादले जात होते. अशा परिस्थितीत श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचे गुरु-पद स्वीकारणे ही केवळ आध्यात्मिक जबाबदारी नव्हे, तर एक मोठे ऐतिहासिक आव्हान होते.

गुरु तेग बहादूर साहिबजींनी आपल्या गुरु-कालावधीत व्यापक प्रवास केला. पंजाबपासून बंगाल, बिहार, आसाम तसेच पूर्व भारतातील अनेक भागांत त्यांनी भ्रमण केले. या यात्रांचा उद्देश केवळ शीख पंथाचा विस्तार नव्हता, तर लोकांमध्ये निर्भयता, आत्मसन्मान आणि ईश्वरावरील खरी श्रद्धा जागवणे हाच होता. ईश्वर एकच आहे आणि सर्व मानव समान आहेत, हे ते शिकवत. जात, धर्माच्या पलीकडे जाऊन सत्य, करुणा आणि प्रेमाचा मार्ग स्वीकारणे हीच खरी भक्ती आहे, असा त्यांचा संदेश होता.

गुरु तेग बहादूरजींची वाणी अत्यंत गूढ व तात्त्विक आहे. त्यांच्या रचना गुरु ग्रंथ साहिबमध्ये संकलित असून त्यामध्ये जीवनाची नश्वरता, मायेची असारता आणि ईश्वरभक्तीचा सखोल संदेश आढळतो. सुख-दुःख, मान-अपमान, भय-लोभ यापलीकडे जो जातो, तोच खऱ्या अर्थाने मुक्त आहे, असे ते सांगतात. आजही त्यांची वाणी माणसाला अंतःकरणाने मजबूत बनण्याची आणि बाह्य परिस्थितींनी विचलित न होण्याची प्रेरणा देते.

गुरु तेग बहादूरजींचे सर्वात महान व ऐतिहासिक योगदान म्हणजे धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी दिलेले त्यांचे सर्वोच्च बलिदान होय. काश्मीरमधील पंडितांवर जबरदस्तीने दुसरा धर्म स्वीकारण्याचा दबाव टाकला जात होता. आपली श्रद्धा, संस्कृती आणि जीवनपद्धती वाचवण्यासाठी ते व्याकुळ झाले होते. जेव्हा ते गुरु तेग बहादूर साहिबजींकडे गेले, तेव्हा गुरुजींनी ही वेदना केवळ एका समुदायाची समस्या मानली नाही, तर तिला संपूर्ण मानवतेच्या व धर्मस्वातंत्र्याच्या प्रश्नाशी जोडले.

कोणत्याही व्यक्तीला आपल्या श्रद्धेनुसार जगण्याचा अधिकार आहे आणि कोणतीही सत्ता हा अधिकार हिरावून घेऊ शकत नाही, असे श्री गुरु तेग बहादूरजींनी ठामपणे सांगितले. भीषण परिणामांची जाणीव असूनही त्यांनी काश्मिरी पंडितांच्या रक्षणाचा संकल्प केला. हा त्यांच्या जीवनातील सर्वात धैर्यशील आणि ऐतिहासिक निर्णय होता. ही बाब तत्कालिन शासकांच्या दरबारापर्यंत पोहोचताच श्री गुरु तेग बहादूरजींना दिल्लीला बोलावण्यात आले. तत्कालिन शासकांचा धर्म स्वीकारल्यास त्यांचे प्राण वाचतील आणि मान-सन्मान व सुविधा मिळतील, असे सांगण्यात आले. पर्यायाने चमत्कार दाखवण्याची मागणीही करण्यात आली. मात्र गुरुजींनी दोन्ही प्रस्ताव नाकारले. धर्मांतर म्हणजे आत्म्याशी द्रोह, तर चमत्कार दाखवणे म्हणजे ईश्वराच्या नावाचा अपमान, असे त्यांचे मत होते. जीवनाची किंमत मोजावी लागली तरी सत्य आणि विवेकाचा मार्ग स्वीकारण्याचा त्यांनी निर्धार केला.

इसवी सन १६७५ मध्ये दिल्लीच्या चांदणी चौकात गुरु तेग बहादूरजींना सार्वजनिकरीत्या शहीद करण्यात आले. त्यांच्या समोरच त्यांचे तीन परम शिष्य भाई मती दास, भाई सती दास आणि भाई दयाल दास यांचा अमानुष छळ करण्यात आला, तरीही गुरु तेग बहादूरजी ठाम राहिले. त्यांनी मृत्यू स्वीकारला; पण आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. भारतीय इतिहासात धार्मिक स्वातंत्र्यासाठी दिलेले हे एक अद्वितीय व अनुपम बलिदान आहे. श्री गुरु तेग बहादूर साहिबजींच्या शहादतीचा दूरगामी परिणाम झाला. या बलिदानाने हे स्पष्ट केले की भारताचा आत्मा सहिष्णुता, विविधता आणि धार्मिक स्वातंत्र्यात दडलेला आहे. त्यांचे पुत्र गुरु गोबिंद सिंहजींनी या शहादतीतून प्रेरणा घेऊन खालसा पंथाची स्थापना केली आणि अन्याय, अत्याचार व असत्याविरुद्ध संघटित संघर्षाचा मार्ग खुला केला. अशा प्रकारे गुरु तेग बहादूरजींचा त्याग येणाऱ्या पिढ्यांसाठी धैर्य आणि आत्मसन्मानाचा शाश्वत स्रोत ठरला.

श्री गुरु तेग बहादूरजींचे जीवन हेही शिकवते की खरा धर्म केवळ आपल्या अनुयायांच्या रक्षणापुरता मर्यादित नसतो. त्यांनी आपले प्राण शीखांसाठी नव्हे, तर हिंदू पंडितांच्या धार्मिक स्वातंत्र्यासाठी अर्पण केले. यामुळे ते संकुचित धार्मिक सीमां पलीकडे जाऊन एक सार्वत्रिक मानवतावादी व्यक्तिमत्त्व ठरतात. मानवता संकटात असताना खरे संत व महापुरुष वैयक्तिक हितांपेक्षा समाजाच्या हितासाठी उभे राहतात, त्यांचे जीवन हा सक्षम पुरावा होय.

आजच्या काळात, जेव्हा जगातील अनेक भागांत धार्मिक असहिष्णुता, हिंसा आणि द्वेष वाढत आहेत, तेव्हा श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचा संदेश अधिकच सुसंगत ठरतो. भीतीसमोर झुकणे सोपे असते; पण सत्यासाठी उभे राहणे हेच खरे धैर्य आहे, हे त्यांचे जीवन शिकवते. आत्मबल आणि नैतिक दृढता कोणत्याही सत्तेपेक्षा अधिक शक्तिशाली असते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले.

इतिहास केवळ विजेत्यांनी नव्हे, तर सत्य, धर्म आणि मानवतेसाठी प्राण अर्पण करणाऱ्या शहीदांनी घडतो, हाच संदेश गुरु तेग बहादूरजींचे जीवन व बलिदानातून आपल्याला मिळतो. त्यांनी अंधःकारातही मानवतेला प्रकाशाचा मार्ग दाखवला. धर्माचे रक्षण तलवारीने नव्हे, तर धैर्य, करुणा आणि सत्यनिष्ठेने होते, त्यामुळे श्री. गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे नाव भारतीय उपखंडात सदैव अमर दीपसारखे प्रज्ज्वलित राहील

(लेखक डॉ. अमरजीत कौंके हे पंजाबी व हिंदी भाषेतील प्रख्यात लेखक असून त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत.)
संपर्क : ९८१४२३१६९८
पटियाला, पंजाब
(गुरुद्वारा जन्मस्थान: शिरोमणी संत नामदेव, नरसी नामदेव, हिंगोली यांच्या सौजन्याने)

# भारताने अमेरिकेशी करार केलेत याचे स्वागत; परंतु भारतातील वाढती महागाई,शेतकऱ्यांच्या समस्या व बेरोजगारीचे काय?

सध्याच्या परिस्थितीत सुपर पॉवर अमेरिका जगातील अनेक देशांशी आपली स्वार्थी चाल खेळुन दबावाखाली ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे.अमेरिका जरी सुपर पॉवर असला तरी तो दगाबाज आणि धोकेबाज देश आहे ही बाब जगातील प्रत्येक देशाला चांगल्या प्रकारे ग्यात आहे. सर्वप्रथम भारता विरुद्ध टेरिफ वाढवुन भारताचा विश्वासघात केला. भारताने अमेरिकेची टेरिफ चाल पहाता आपण आपला मित्र देश रशिया जास्त जवळीक केली.त्याचबरोबर अमेरिकेला अलगथलग करण्यासाठी व त्याची अरेरावी कमी करण्यासाठी रशियाचा मित्र चीन आणि भारताचा कट्टर शत्रू यांची रशियाच्या सहाय्याने जवळीक वाढली आणि अमेरिकेला जशास तसे उत्तर देण्यासाठी म्हणून भारत,रशिया आणि चीन एकत्र येऊन याचा व्यापारीक करार मोठ्या प्रमाणात करण्यात आला.या तिन देशांच्या जवळीकला दोन ते तीन महिने होताच अमेरिकेने भारतावरील प्रेम वाढविले आणि टेरिफ कमी करण्याची घोषणा करत अनेक व्यापारीक करार झाले.परंतु हे संपूर्ण करार रशिया,चीन आणि भारत यांच्यात व्दीधा निर्माण करून अमेरिकेने भारताला पुन्हा जवळ केले यावरून भारताने अमेरिके पासून सावध रहाण्याची गरज आहे.अमेरिकेने अफगाणिस्तान, युक्रेन इत्यादी अनेक देशांना रक्ताच्या लाथोळ्यात सोडून पसार झाला अशा प्रकारे जगातील अनेक देशांना आपल्या वर्चस्वासाठी आणि स्वार्थासाठी धोका दिला आहे.त्याच पध्दतीने अमेरिका भारतासोबत व्यापार व्यवहार करू शकतो याला नाकारता येत नाही.कारण अमेरिका कधीच कोणाचाच झाला नाही आणि होणार नाही.तो फक्त आपले व्यापारीक स्वार्थ शोधत असतो व त्याच्या सोबतच दोस्तीचा हात समोर करतो.परंतु त्या देशाला ब्लॅकमेल करून केव्हाही धोका सुद्धा देऊ शकतो.अमेरिकेने भारतासोबत व्यापार करार तर केलेत यातही त्याची अरेरावी दिसून येते.अमेरिका म्हणतो की, भारताने आमच्या कडून कापूस आयात केला तर टेक्सटाइलवर झिरो टेरिफ लागेल.परंतु भारताने जर अमेरिकेतून कापूस आयात केला तर भारतीय शेतकऱ्यांच्या कापसाला कवडीमोलाचे भाव येतील हेही तितकेच सत्य आहे. यावरून स्पष्ट होते की अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारतीय शेतकऱ्यांची कंबर तोडण्याच्या प्रयत्न करीत आहे. भारतात शेतकऱ्यांच्या अनेक समस्या आहेत.अजुनही भारतातील शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही.याकरीता अनेकदा आंदोलने होतांना आपण पहाले आणि आताही आंदोलने होत आहेत. परंतु कृषी प्रधान देशातील शेतकऱ्यांना अजुन पर्यंत योग्य न्याय मिळालेला नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.विदेश निती टीकवुन ठेवण्यासाठी भारताचा अमेरिके सोबतचा करार योग्य आहे. परंतु भारताने हेही लक्षात ठेवले पाहिजे की पाकिस्तान,चीन पेक्षा जास्त दगाबाज अमेरिका सुद्धा आहे ही बाब संपूर्ण जग जाणतो.अमेरिकेच्या लक्षात आले की भारत,रशिया, चीन एकत्र आले तर आपली खैर नाही.त्यामुळेच अमेरिकेने टॅरिफ डाव खेळल्याचे स्पष्ट होते.भारत सरकारला हे लक्षात का येत नाही की, भारतात शेतकरी आत्महत्या का करतात.आजही भारतातील शेतकऱ्यांच्या समस्या व आत्महत्या थांबलेल्या नाहीत अशा परिस्थितीत अमेरिकेतील वस्तू जर भारतात कमी भावात मिळाली तर शेतकऱ्यांच्या मालाच्या भावाचे काय? असे अनेक प्रश्न आज शेतकऱ्यांपुढे उपस्थित होत आहे. भारताने अमेरिकेशी व्यापार करार करतांना हेही लक्षात ठेवले पाहिजे की,भारतातील महागाई, वाढत्या आधुनिकीकरणामुळे वाढती बेरोजगारी, ईपीएस -९५ पेंशन धारकांचा प्रश्न, वाढते कुपोषण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या ह्या संपूर्ण गंभीर समस्यांचे मुख्य कारण देशातील वाढती महागाई आहे.भारत सरकार देशातील महागाईकडे दुर्लक्ष करून अमेरिकेसोबत वाटेल ते करार करून देशात महागाईचा डोंगर उभा होत आहे यावर सुद्धा सरकारने लक्ष देण्याची गरज आहे.देशाचा विकास झपाट्याने होत आहे यात दुमत नाही.परंतु बेरोजगारीचा मोठा कळस उभा होत आहे या संपूर्ण गोष्टींकडे सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.कारण देशाच्या विकासासोबत मुलभूत सुविधांकडे सुध्दा लक्ष देण्याची गरज आहे.याकडे दुर्लक्ष झाले तर गरीब व सर्वसामान्यांचे हाल बेहाल होतील. कारण देशात अनेक सरकारे आलीत आणि गेलीत परंतु एकाही सरकारने महागाईवर ठोस तोडगा काढलाच नाही. याचा परिणाम आजही देशातील ८० टक्के जनता महागाईच्या रूपात भोगत आहेत.देशातील महागाई कमी झाली तर सर्वच समस्या आपोआप कमी होईल.जय हिंद.

**-रमेश कृष्णराव लांजेवार,**
नागपूर

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ८८ शिक्षणक्रमांना ऑनलाईन प्रवेश घेण्यास दिनांक २८ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ

नाशिक दि.१७ (प्रतिनिधी)- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ११ विद्याशाखेंतर्गत असलेल्या विविध ८८ शिक्षणक्रमांचे शैक्षणिक सत्र जानेवारी २०२६ करीता नवीन विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश घेण्यास येत्या दिनांक २८ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच जानेवारी २०२५ या सत्रात ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षास प्रवेश घेतलेला आहे; अशा विद्यार्थ्यांसाठी द्वितीय वर्षाचीही ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. शासनाचे नवीन शैक्षणिक धोरण व विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयानुसार कृषी शिक्षणक्रम, बी. एड. (सेवांतर्गत), बी. एड. (विशेष) तसेच विज्ञान विद्याशाखेच्या शिक्षणक्रमांव्यातिरिक्त उर्वरित सर्व शिक्षणक्रमांसाठी ही प्रवेश प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांना नियमित पदवी सोवत दूरशिक्षणाद्वारे अधिकची एक पदवी विनाविलंब शुल्कासह घेता येणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी दिली आहे.

'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रीदवाक्य घेऊन स्थापनेपासून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने शिक्षणापासून वंचित असलेल्या समाजातील विविध घटकातील लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणण्याचे काम केले आहे. त्यातून अनेक विद्यार्थी प्रशासकीय व खाजगी संवेत उच्चपदावर कार्यरत आहेत. मानाची पदे भूषवत आहेत. हे विद्यापीठ सर्वसामान्य ते विशेष पारंगत अशा सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचे प्रवेशद्वार ठरत आलेले आहे. येथे विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख तसेच वेब रेडिओ, दृकश्राव्य माध्यम व मोबाईलद्वारे देखील मार्गदर्शन केले जाते. दोनवेळा आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित, दूरशिक्षण क्षेत्रातील भारतातील अग्रगण्य यूजीसी मान्यताप्राप्त व महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात पोहोचलेले एकमेव मुक्त विद्यापीठ आहे. विद्यापीठातर्फे सेनादल सैनिक, बंदीजन, कृषि सेवक, शेतमजूर आणि समाजातील इतरही घटक यांच्यासाठी विशेष शिक्षणक्रम आहेत. शिवाय ए.आय. डाटा सायन्स, सायबर ॲक्ट ते बीए, बीकॉम, एम. ए., एम. कॉम., एम. लिब., एम. सी. ए. यासह विविध व आधुनिक कौशल्य विकासाचे प्रमाणपत्र, पदविका, पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रम उपलब्ध आहेत. हे सर्व शिक्षणक्रम नोकरदारांना आपली नोकरी व व्यवसायिकांना आपला व्यवसाय सांभाळून पूर्ण करता येतात. त्यामुळे संबंधित इच्छुकांना आपले राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याची व सर्वार्थाने प्रगती साधण्याची संधी उपलब्ध होत आहे.

त्या अनुषंगाने दिनांक २० जानेवारी २०२६ पासून विद्यापीठाच्या ११ विद्याशाखेंतर्गत विविध ८८ शिक्षणक्रमांचे ऑनलाईन प्रवेश सुरु करण्यात आले आहेत. त्यात प्रमाणपत्र ३२, पदविका ३०, पदवी ११ व पदव्युत्तर १५ शिक्षणक्रमांचा समावेश आहे. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ही फक्त ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्र्माचे शुल्क देखील ऑनलाईन पद्धतीने भरून विद्यार्थ्यास प्रवेश अर्ज सादर करता येईल.

प्रवेशासाठीची मुदतवाढ ही येत्या दिनांक २८ फेब्रुवारीपर्यंत असणार आहे. ऑनलाईन प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या विहित मुदतीत विद्यापीठाच्या http://ycmou.digitaluniversity.ac या वेबसाईटला भेट द्यावी. तेथे ॲडमिशन या पर्यायावरून येथे विविध शिक्षणक्रमांच्या माहितीपुस्तिका उपलब्ध आहेत. काही तांत्रिक अडचण असल्यास कार्यालयीन वेळेत (०२५३)२२३०५८०, २२३१७१५, २२३०१०६, २२३१७१४ या विद्यार्थी मदत केंद्रावरील दूरध्वनी क्र्मांकावर किंवा ९३०७५७९८७४, ९३०७५६७१८२ अथवा ९२७२०४६७२५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा आणि लवकरात लवकर प्रवेश घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे व विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक डॉ. प्रकाश देशमुख यांनी केले आहे.

# हिंगोलीत होम मिनिस्टरचा उत्साह जिजाऊच्या लेकीने पटकावल्या मानाच्या पैठणी साड्या

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** येथील छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित होम मिनिस्टर स्पर्धेत जिजाऊंच्या लेकींनी आपल्या बुद्धी आणि कौशल्याच्या जोरावर मानाच्या पैठणी साड्यांवर आपले नाव कोरले. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या स्पर्धेत हिंगोली शहर व जिल्ह्यातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून शिवजयंती उत्सवाचा आनंद द्विगुणित केला.

हिंगोली येथील छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने होम मिनिस्टर स्पर्धेत मानाची पैठणी व विविध भेटवस्तू जिंकण्यासाठी स्पर्धा घेण्यात आली स्पर्धेचे सुंदर संचलन अकोला येथील टीव्ही स्टार अजिंक्य देशमुख यांनी केले तर

उद्घाटक म्हणून नगराध्यक्ष रेखाताई श्रीराम बांगर ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून सुषमाताई राम कदम, राजमती शिवाजी मुटकुळे ह्या होत्या. यावेळी अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष सुनिताताई मुळे ह्या होत्या. या स्पर्धेत ३ पैठण्या साड्या व विविध वस्तूंचे विजेत्यांना वाटप करण्यात आले.



हिंगोली येथील छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने दि.१७ फेब्रुवारी सोमवार रोजी शिवाजी महाराज पुतळ्याच्या परिसरात

सायंकाळी होम मिनिस्टर स्पर्धेत मानाची पैठणी व विविध भेटवस्तू जिंकण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, या स्पर्धेत हिंगोली शहरातील व जिल्ह्यातील जिजाऊच्या लेकीने मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता.

तब्बल तीन तास चाललेल्या या स्पर्धेत महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध खेळ, नृत्य स्पर्धा आणि प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती. बुद्धी, बल आणि सामर्थ्य यांचा कस लागणाऱ्या या स्पर्धेत महिलांचा उत्साह ओसंडून वाहत होता. केवळ खेळच नव्हे, तर जिजाऊंच्या लेकींचे शौर्य आणि चातुर्यही या निमित्ताने पाहायला मिळाले.

स्पर्धेच्या शेवटी मानाच्या तीन पैठणी साड्यांचे वितरण करण्यात आले. ज्यामध्येप्रथम क्रमांक विनया सचिन बासटवार (मानाची पैठणी) द्वितीय क्रमांक शांताबाई जगन वाबळे, तर तृतीय क्रमांक माया दयानंद काळे ह्या मानकरी ठरल्या, याशिवाय अन्य विविध बक्षिसाचे वितरण या वेळी करण्यात आले. यावेळी सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या सचिव रजनी पाटील, उपाध्यक्ष विद्याताई पवार, उषाताई इंगोले, अर्चना जाधव,साधना हेंबाडे, अरुणाताई अंभोरे, सुनीता सूर्यतळ, कोषाध्यक्ष कांता कल्याणकर यांच्यासह जयंती मंडळाच्या सीमा वडतकर, अलका लोखंडे, सीमाताई भिसे,विद्या पतंगे, सुवर्णा बोरकर, जया पवार, नीता सावके, शारदा दोडके, छाया मगर, बलवंत कौर, जया सावके, मंजुषा बासटवार, ज्योती शेळके, प्राजक्ता पाटील, वसुंधरा सवनेकर, राधिका देशमुख, वृषाली पाटील, साधना घ्यार, शिल्पा भालेराव, सुजाता जोजार,वंदना सरनाईक आदींसह मोठ्या संख्येने मंडळाच्या पदाधिकारी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रायोजक डॉ.स्वाती पवार, डॉ.वैशाली सावळे, डॉ.वर्षा पवार, डॉ. सोनाली कदम ह्या होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार मंडळाचे अध्यक्ष सुनीताताई मुळे यांनी केले .

स्पर्धा यशस्वीतेसाठी खंडेराव सरनाईक डॉ.रमेश शिंदे, मनीष आखरे, प्रकाश इंगोले यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या महिला पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले स्पर्धेत मोठ्या संख्येने शहरातील व परिसरातील महिला सहभागी झाल्या होत्या.

## आजपासून पुसेगावात आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक महोत्सवाला प्रारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**



श्री 1008 भगवान बाहुबली तीर्थक्षेत्र,पुसेगाव (महा.)

**हिंगोली–** सेनगाव तालुक्यातील पुसेगाव येथे आजपासून आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक महोत्सवाला भक्तिमय वातावरणात उत्साहपूर्ण सुरुवात झाली आहे. दि.१८ ते २२ फेब्रुवारी दरम्यान हा भव्य धार्मिक सोहळा संपन्न होणार असून संपूर्ण परिसरात आध्यात्मिक उत्साहाची लहर निर्माण झाली आहे.

महोत्सवानिमित्त आयोजकांकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. सुमारे १५ ते २० एकर विस्तीर्ण परिसरात आकर्षक मंडप उभारण्यात आला असून मुख्य वेदीची भव्य सजावट करण्यात आली आहे. धार्मिक विधींसाठी स्वतंत्र व्यवस्था, प्रकाशयोजना, ध्वनीव्यवस्था तसेच भाविकांसाठी सुयोग्य बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी राहण्याची व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. सुमारे १०० ते १५० सर्व सुविधांनी युक्त खोल्यांची व्यवस्था करण्यात आली असून पिण्याचे शुद्ध पाणी, स्वच्छता, वैद्यकीय सुविधा आणि सुरक्षा यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

यावेळी विभवसागरजी महाराज यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, पंचकल्याणक महोत्सव हा जैन धर्मातील अत्यंत पवित्र व महत्त्वपूर्ण धार्मिक सोहळा आहे. या सोहळ्यात तीर्थंकरांच्या गर्भ, जन्म, दीक्षा, केवलज्ञान आणि मोक्ष या पंचकल्याणकांचे विधीपूर्वक स्मरण व पूजन केले जाते. मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार असल्याने सर्व नियोजन काटेकोरपणे करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने अशोक घारगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, नर्सी पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. वाहतूक सुरळीत राहावी व भाविकांची सुरक्षितता अबाधित राहावी यासाठी ठिकठिकाणी पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

महोत्सव काळात विविध धार्मिक विधी, प्रवचने व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून पुसेगाव नगरीत या निमित्ताने सर्वत्र भक्तीमय आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे. मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची शक्यता असून हा महोत्सव ऐतिहासिक ठरणार असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे.

कार्यक्रमासाठी देशाचे गृहमंत्री अमित शहा तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीची शक्यता व्यक्त होत आहे; मात्र त्यांच्या भेटीची तारीख अद्याप निश्चित झालेली नाही.

## ०४ गुंठे शेतीमध्ये बेकायदेशीर अफु लागवडीवर हिंगोली एलसीबीचा छापा

### ०१ क्विंटल ७७ किलो अफुझाडासह ३,५४,९००/- रू चा मुद्देमाल जप्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी हिंगोली जिल्हयातील अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन करून कारवाई करण्यासाठीच्या सुचना पोलीस स्टेशन, विविध पथके तसेच स्थानिक गुन्हे शाखा यांना दिल्या असुन त्याअनुषंगाने दररोज कार्यवाही करण्यात येत आहे.

दिनांक १६.०२.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा हिंगोलीचे पथक पोलीस स्टेशन कुरूंदा हद्दीत पेट्रोलींग करीत असताना गोपणीय माहिती मिळाली की, मौजे सिरळी शिवारात एका शेतामध्ये अवैधरित्या अफुची लागवड केली आहे अशी माहिती मिळाल्यावरून पोनि मोहन भोसले, स्थागुश हिंगोली यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे यांच्या पथकाने सिरळी शेत शिवारात छापा मारला असता सदर ठिकाणी इसम नामे प्रताप सुरेश नलगे रा. सिरळी ता. वसमत जि. हिंगोली यांच्या ताब्यातील अंदाजे ०४ गुळे शेतीमध्ये लसणाच्या पिकात बेकायदेशीर अफु लागवड केल्याचे मिळुण आले. शेतमालक इसम नामे प्रताप नलगे यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता सदर अफुची झाडे विकी करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीरपणे लागवड केल्याचे सांगीतले. सदर अफुचे बोंडे, फुले असलेले झाडाचे राजपत्रीत अधिकारी व पंचासमक्ष वजन केले असता त्याचे वजन ०१ क्विंटल ७७ किलो ४५ ग्रॅम किंमती अदांजे ३,५४,९००/- रू चा मुद्देमाल मिळुन आल्याने कायदेशीररीत्या फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी पथकाच्या मदतीने सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन शेत मालक प्रताप सुरेश नलगे वय ४२, व्य. शेती रा.सिरळी ता. वसमत जि. हिंगोली यास ताब्यात घेवुन त्यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन कुरूंदा गुरनं ५६/२०२६ कलम ८ (क), १८ एनडीपीएस कायदान्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. यानंतर सुध्दा हिंगोली जिल्हयात अवैध धंदयाविरूध्द कठोर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे पोलीसांतर्फे सांगण्यात आले.



सदरची कार्यवाही डॉ. नीलाभ रोहन, पोलीस अधीक्षक हिंगोली, कमलेश मीना, अपर पोलीस अधीक्षक, पोनि मोहन भोसले स्थागुशा यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, स्थागुशा पोलीस अंमलदार भुजंग कोकरे, गजानन पाकळे, ज्ञानेश्वर गोरे, आकाश टापरे, नरेंद्र साळवे, साईनाथ कंठे, किशोर सावंत तसेच पोस्टे कुरूंदाचे पोउपनि कारामुंगे, संदीप टाक, साठे यांच्या पथकाने केली आहे.

## स्थानिक गुन्हे शाखा कडुन जिल्हयात अवैध धंद्याविरुध्द कठोर कार्यवाही ०१ एन.डी.पी.एस. कार्यवाही, ०१ अवैध गौण खनिज (वाळु) कार्यवाही, ०३ दारुबंदी व ०१ मटका जुगार असे एकुण ०६ कार्यवाही मध्ये ९,३३,८१०/- रु मुद्देमाल जप्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** दिनांक १६/०२/२०२६ रोजी हिंगोली जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांचे आदेशाने व पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. यांचे मार्गदर्शनाखाली स्था. गु.शा. पथकांनी हिंगोली जिल्हयात गोपनिय माहितीच्या आधारे विविध ठिकाणी छापे टाकुन खालील प्रमाणे कार्यवाही केली आहे.



१) पो.स्टे. कुरूंदा हद्दतील मौजे सिरळी येथे इसम नामे प्रताप सुरेश नलगे, वय ४२ वर्ष, याने त्याचे शेतात अंमली पदार्थ सदृश्य असलेले अफुचे (खसखस) हिरवे ओले ताजे पाने व फुले असलेले बॉंढासहित, मुळासहित उपटलेले झाडाची लांबी सुमारे ०२ ते ०४ फटापर्यंत असलेली वनस्पतीच्या ०९ मोळया वजन १ क्विटल ७७ किलो ४५ ग्रॅम किंमती अंदाजे (प्रतिकिलो २००० रू प्रमाणे) एकुण ३,५४,९००/- रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपी विरूध्द पो.स्टे. कुरूंदा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२२५१५१२ पो.स्टे. कळमनुरी हद्दीतील नांदापुर येथे इसम नामे देवराव मुधाजी बेले, वय ३८ वर्ष, रा. सोडेगाव, ता. कळमनुरी याने त्याचे खतःचे फायदयासाठी एका ट्रॅक्टर, ट्रॉलीमध्ये ०१ ब्रास वाळु विनापरवाना बेकायदेशीरीत्या अवैध चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने त्याचेविरूध्द जमीन महसुल अधिनियम प्रमाणे पो.स्टे. कळमुनरी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३) पो.स्टे. हिंगोली ग्रामीण, औंढा ना., सेनगाव येथे दारूबंदी कायदयान्वये एकुण ०३ आरोपीविरूध्द (०३) गुन्हे दाखल करून ३,९१०/- रूपयाचा मुद्देमाल जप्त करून करण्यात आला आहे.

४) पो.स्टे. हिंगोली शहर हददीत जुगार कायदयाप्रमाणे ०१ इसमाविरूध्द गुन्हा दाखल करून ९४० रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन,अपर पोलीस अधीक्षक कमलेश मिना, मोहन भोसले, पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा. हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. शिवसांब घेवारे, पोउपनि. माधव जिव्हारे, पोउपनि, दिलीप मोरे व स्था.गु.शा. पथकाने केली आहे.

## प्रत्येक गावात युवासेनेची शाखा स्थापन करणार-युवासेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत शिंदे

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी शिवसेनाप्रमुख स्व बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापन केली शिवसेना ही ५९ वर्षाचे वटवृक्ष आहे त्या वृक्षाची वाळलेली पाने गळून पडली आहेत पुन्हा नवीन पालवी फुटून वृक्ष बहरणार आहे वसमत विधानसभा मतदार संघात पक्ष बळकट करण्यासाठी युवासेनेची गावोगावी शाखा स्थापन करणार असल्याचे मत युवासेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत शिंदे यांनी व्यक्त केले



युवासेनेच्या जिल्हाप्रमुखपदी चंद्रकांत शिंदे यांच्या निवडीनंतर वसमत येथे शिवसेना महिला जिल्हाप्रमुख डॉ रेणुका पतंगे, शिवसेना शिक्षकसेना जिल्हाध्यक्ष गजानन मुळे, शिवसेना सर्कलप्रमुख दत्तराव अंभोरे यांची उपस्थितीत शासकीय विश्रामगृह येथे बैठक पार पडली

यावेळी मार्गदर्शन करताना वसमत विधानसभेतील प्रत्येक गावामध्ये युवासेनेच पक्ष संघटन करून शाखा स्थापन करणार असे प्रतिपादन युवासेनेचे जिल्हाप्रमुख चंद्रकांत शिंदे यांनी वसमत येथे बैठकी दरम्यान आपले मनोगत व्यक्त केले यावेळी युवासेना जिल्हा चिटणीस संदीप कातोरे,डॉ गजानन पतंगे, राजू क्षीरसागर,माधव सदगर, जगरनाथ राखोंडे, मुंजाजी आहेर ,माऊली पिंपरकर ,पुंजाजी खराटे, आकाश अंभोरे ,नवनाथ आहेर, गजानन वाजे ,शिवम साखरे,सोनू राऊत, सोनू गायकवाड, शुभम साखरे नारायण मगर सोपान ढोणे पुंजाजी खराटे, प्रसाद खराटे, सचिन खराटे, राजाराम जगताप, गजानन जगताप, शशिकांत जगताप, चंदू शिंदे बोरगाव,बाळू जाधव, गजानन लिंगायत, माधव साखरे, विक्रम वंजे, तानाजी गाढवे, वैभव गाढवे, संतोष वाघमारे,मगर आदींची उपस्थिती होती.



## हिंगोलीच्या मंगळवारा भागात चिमणी बाजार गजबजला; जागेच्या अभावी जलेश्वर मंदिर परिसरातून स्थलांतर

**✱ निलेश गरवारे**

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली शहराची जुनी परंपरा असलेला आणि स्थानिक शेतकऱ्यांची ओळख असलेला चिमणी बाजार आता मंगळवारा बाजार पेठेत पूर्ण क्षमतेने भरू लागला आहे. नगर पालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या नियोजनामुळे हा बाजार आता अधिक सुटसुटीत झाला असून, भाजीपाला विक्रेते आणि ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.दर मंगळवारी भरणारा हा बाजार प्रामुख्याने शेतकरी बाजार म्हणून ओळखला जातो. स्थानिक शेतकरी आपला शेतातला ताजा भाजीपाला थेट ग्राहकांना विकण्यासाठी येथे येतात. अत्यंत कमी किमतीत आणि ताज्या मालासाठी हा बाजार प्रसिद्ध असल्याने याला स्थानिक भाषेत चिमणी बाजार असे नाव पडले आहे.

मंगळवारा बाजार पेठ ही मोठी आणि मोकळी असल्याने, आता शेतकऱ्यांना आपला माल मांडण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध झाली आहे. नगर पालिकेने येथे स्वच्छतेचे आणि बसण्याचे योग्य नियोजन केल्याने ग्राहकांचा प्रतिसादही वाढला आहे. ''जलेश्वर मंदिर परिसरात जागा मिळेनाशी झाली होती, पण आता मंगळवारा पेठेत मोकळेपणाने व्यापार करता येत आहे,'' अशी भावना स्थानिक शेतकऱ्यांनी व्यक्त केली. दरम्यान आमचे शहर प्रतिनिधी निलेश गरवारे यांनी या चिमणी बाजारात जाऊन ग्राउंड रिपोर्ट ची बातमी तयार केली अप्रत्यक्ष ग्रामीण भागातील आलेल्या शेतकऱ्याची संवाद साधून या चिमणी बाजाराची एक गेल्या अनेक वर्षापासून असलेली परंपरा शेतकऱ्यांनी बोलून दाखविली तसेच या बाजारात मिळणाऱ्या वस्तू ह्या शेतकऱ्यांनी ताज्या शेतातील आणलेल्या भाजीपाला असल्यामुळे या बाजाराला हिंगोली शहरात अन्यसाधारण महत्त्व प्राप्त असल्याची यावेळी या शेतकऱ्यांनी आपल्या भावना बोलताना व्यक्त केले आहे.

## शिवजन्मोत्सवा निमित्त आयोजित नृत्य, वेशभूषा, अभिनय स्पर्धांना उदंड प्रतिसाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित नृत्य स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, अभिनय स्पर्धा या विविध स्पर्धांच्या आयोजन दि.१७ फेब्रुवारी मंगळवार रोजी करण्यात आले होते त्यास उदंड प्रतिसाद मिळाला.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरामध्ये सार्वजनिक शिवजयंती महोत्सव महिला समितीच्या वतीने दि ११ फेब्रुवारी पासून सुरू आहे. त्यामध्ये विविध स्पर्धा होत आहेत दिनांक १७ फेब्रुवारी मंगळवार रोजी बालगट व खुल्या गटासाठी नृत्य स्पर्धा वेशभूषा आणि अभिनय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेचे उद्घाटन कल्पनाताई भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्या हस्ते झाले प्रमुख पाहुणे म्हणून लीना ताई दिलीप चव्हाण ह्या होत्या तर अध्यक्षस्थानी महोत्सव समिती अध्यक्षा सुनीताताई मुळे ह्या होत्या.तर प्रमुख उपस्थितीमध्ये शिवजयंती महोत्सव समितीच्या उपाध्यक्ष विद्याताई पवार, अर्चना जाधव, सचिव रजनी पाटील यांच्यासह कांताबाई कल्याणकर, अनिता सूर्यतळ, अरुणा आंभोरे, साधना हेंबाडे, सीमा वडकर, स्वातीताई भोयर, विद्या पतंगे, उषा इंगोले आदींची उपस्थिती होती. स्पर्धेचे प्रायोजक परी कलेक्शनच्या उशा किरण गायकवाड तसेच सोनकळी ज्वेलर्सच्या तेजस्विनी टाकळगावकर, डॉ.माधुरी देशमुख ह्या होत्या.

या स्पर्धे अंतर्गत सुरुवातीला वेशभूषा तसेच अभिनय स्पर्धा घेण्यात आल्या त्यामध्ये बालगट व खुल्या गटातील स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला त्यानंतर वैयक्तिक नृत्य व समूह नृत्य स्पर्धा झाल्या या स्पर्धांनाही उदंड प्रतिसाद मिळाला हिंगोली शहरातील शाळांसह जिल्हाभरातून विविध ठिकाणचे स्पर्धक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सायंकाळी उशिरापर्यंत ह्या स्पर्धा सुरू होत्या. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रणिता कौलवार, रक्षा बगडीया, माधुरी बोरबळे, सोनु भालेराव यांनी जबाबदारी पार पाडली. सूत्रसंचालन सुजाता जोजारे व शिल्पा भालेराव यांनी केले तर आभार विद्या पवार यांनी मानले.स्पर्धा यशस्वीतेसाठी सागर चौधरी, मंजू बगडिया जयंती महोत्सव समितीच्या महिलांनी परिश्रम घेतले. स्पर्धेतील विजत्यांना दिनांक १९ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता बक्षीस वितरण केले जाणार आहे तेव्हा सर्व स्पर्धकांनी या बक्षिस वितरण सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## 'भारत विस्तार' डिजिटल प्रणालीचे केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते ऑनलाईन लोकार्पण

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली आणि कृषी विज्ञान केंद्र, तोंडापूर येथे 'भारत विस्तार' या महत्त्वाकांक्षी डिजिटल ॲपच्या कार्यक्रमाचे ऑनलाईन उद्घाटन झाले.




जयपूर (राजस्थान) येथून आयोजित राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते 'भारत विस्तार' ॲपचे लोकार्पण करण्यात आले.

या ॲपच्या माध्यमातून देशातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, विविध शासकीय योजना, हवामान अंदाज, पीक संरक्षण, मृदा व्यवस्थापन तसेच बाजारभाव यांसारखी अद्ययावत माहिती एकाच क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा केव्हीकेचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. पी. पी. शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली वेबकास्टिंगचे नियोजन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. शेळके यांनी भारत विस्तार ॲपमुळे दुर्गम भागातील शेतकऱ्यांना थेट शास्त्रज्ञांकडून तांत्रिक मार्गदर्शन सुलभ होणार असून, ही कृषी क्षेत्रातील डिजिटल क्रांती ठरेल. हिंगोली जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी उपस्थित शेतकरी, कृषी पदवीधर तसेच महिला बचत गटांच्या सदस्यांनी थेट प्रक्षेपणाद्वारे ॲपच्या कार्यप्रणालीची सविस्तर माहिती घेतली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विषय विशेषज्ञ राजेश भालेराव (कृषी विद्या), अनिल ओळंबे (उद्यानविद्या), अजयकुमार सुगावे (पीक संरक्षण), रोहिणी शिंदे (गृह विज्ञान), डॉ. अतुल मुराई (कृषी विस्तार), साईनाथ खरात (मृदा विज्ञान), डॉ. कैलास गीते (पशु विज्ञान) तसेच विजय ठाकरे यांनी परिश्रम घेतले. तसेच मनीषा मुंगल, ओमप्रकाश गुडेवार, गुलाबराव सूर्यवंशी, मारोती कदम, संतोष हानवते व प्रेमदास जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# दहावीच्या विद्यार्थ्यांना भावनिक निरोप; कै पार्वतीबाई विद्यालयात उत्साहात समारंभ

*** राजीक शेख**
**आत्ताच एक्सप्रेस**

**माहूर –** कै पार्वतीबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे आज दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी दहावीच्या विद्यार्थ्यांना नववीच्या विद्यार्थ्यांतर्फे भावनिक वातावरणात निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. कार्यक्रम अतिशय उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव सचिनभाऊ राजुरकर होते, तर उपाध्यक्ष म्हणून जगदंबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चे प्राचार्य विश्वास जाधव उपस्थित होते. तसेच



तुळशी परिसर विद्यालय चे मुख्याध्यापक प्रतीक नागपुरे व मयुरेश राजुरकर यांनी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे प्राचार्य जी. यू. वट्टमवार यांनी मांडले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा आढावा घेत पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी विचार व्यक्त केले.

यावेळी दहावीचे वर्ग शिक्षक चव्हाण सर यांनी विद्यार्थ्यांना भावनिक शब्दांत मार्गदर्शन केले. तसेच नववीच्या वर्ग शिक्षिका कोमल देवकर यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सहकार्य केले. परीक्षेच्या तयारीबाबत अंकुश राठोड सर व रामटेके सर यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला संजय मगरे सर, जी. बी. राठोड, बी. डी. सलाम, पूजा राजुरकर, तन्वी ढगे, किरण राठोड सर, कन्नलवार, गोकणवार, नागपुरे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नववीच्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, मनोगते व शुभेच्छांद्वारे दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप दिला. या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दिसून आले आणि संपूर्ण परिसर भावनिक वातावरणाने भारावून गेला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# पर्यावरणाचे उमरी मॉडेल अव्वल! माझी वसुंधरा ५.० मध्ये पेठ उमरी नगरपरिषदेने मारली बाजी

## छत्रपती संभाजीनगर विभागात १५ हजार लोकसंख्या गटात पटकावला प्रथम क्रमांक; ७५ लाखांचे बक्षीस जाहीर!

**आत्ताच एक्सप्रेस**

**उमरी –** निसर्ग संवर्धन आणि पर्यावरण रक्षणाच्या ध्येयाने प्रेरित होऊन राबवण्यात आलेल्या माझी वसुंधरा ५.० अभियानात पेठ उमरी नगरपरिषदेने आपल्या कार्यकर्तृत्वाचा झेंडा फडकवला आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातून १५ हजार लोकसंख्या गटात पेठ उमरीने प्रथम क्रमांक पटकावून ७५ लाख रुपयांचे भरीव बक्षीस आपल्या नावावर केले आहे. या ऐतिहासिक यशाचा गौरव २१ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

**यशाची मोठी झेप: ७५ लाखांचा सन्मान**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी माझी वसुंधरा अभियानात पेठ उमरी नगरपरिषदेने अत्यंत नियोजनबद्ध काम केले. पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या पंचतत्त्वांवर आधारित कामांचे मूल्यमापन करण्यात आले होते. यात उमरीने दाखवलेली चिकाटी आणि राबवलेले नाविन्यपूर्ण प्रकल्प यामुळे विभागात नगरपरिषदेने अव्वल स्थान गाठले आहे. या यशाबद्दल नगरपरिषदेला ७५ लाख रुपयांचा विकास निधी बक्षीस स्वरूपात मिळणार आहे.

**मुंबईत रंगणार शाही सत्कार सोहळा**

येत्या २१ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे आयोजित विशेष सोहळ्यात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शुभहस्ते पेठ उमरी नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष, मुख्याधिकारी व त्यांच्या टीमचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. प्रशासकीय कौशल्य आणि लोकसहभागाचा हा मोठा विजय असल्याचे बोलले जात आहे.

**यशाची त्रिसूत्री :**

प्रशासकीय शिस्त: मुख्याधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे अहोरात्र कष्ट.

लोकसहभाग: उमरीकरांनी पर्यावरण रक्षणासाठी दिलेली सक्रिय साथ.

नियोजनबद्ध अंमलबजावणी: वृक्षारोपण, सांडपाणी व्यवस्थापन आणि सौर ऊर्जेचा वापर.

''हे यश केवळ नगरपरिषदेचे नसून प्रत्येक उमरीकराचे आहे. पर्यावरणाचे रक्षण करत असतानाच शहराच्या विकासाला नवी दिशा देण्याचा आमचा प्रयत्न यशस्वी ठरला आहे. ७५ लाखांचे हे बक्षीस शहराच्या पुढील विकासकामांसाठी मैलाचा दगड ठरेल.''

पेठ उमरी नगरपरिषद प्रशासन

या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यात आणि विभागात पेठ उमरी नगरपरिषदेचे कौतुक होत असून, २१ फेब्रुवारीच्या सोहळ्याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. मी तुमच्यासाठी या बातमीचे सोशल मीडिया पोस्टसाठी छोटे कॅप्शन किंवा व्हॉट्सॲप स्टेटस तयार करून देऊ का?



# जिल्हाधिकाऱ्यांची लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयास भेट; परीक्षा नियोजन व शिस्तबद्ध व्यवस्थेबाबत व्यक्त केले समाधान

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड –** इयत्ता बारावीच्या सुरू असलेल्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी आज धर्माबाद येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय या परीक्षा केंद्राला भेट देऊन व्यवस्थेचा आढावा घेतला. भेटीदरम्यान त्यांनी परीक्षा केंद्रावरील प्रश्नपत्रिका सुरक्षित साठवणूक व्यवस्था, सीसीटीव्ही यंत्रणा, विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था, परीक्षा हॉलमधील शिस्त, तसेच पर्यवेक्षकांची उपस्थिती यांची पाहणी केली. परीक्षा सुरळीत, पारदर्शक व कॉपीमुक्त वातावरणात पार पडावी यासाठी केंद्रावर करण्यात आलेल्या नियोजनाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, प्रकाश व्यवस्था तसेच आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचेही त्यांनी पाहिले. केंद्रप्रमुख व शिक्षकांनी जबाबदारीने व नियोजनबद्ध पद्धतीने परीक्षा व्यवस्थापन केल्याबद्दल जिल्हाधिकारी श्री. कर्डिले यांनी त्यांचे कौतुक केले.

जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांनी याच पद्धतीने काटेकोरपणे नियमांचे पालन करून परीक्षा पार पाडाव्यात, तसेच विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकाराला बळी न पडता आत्मविश्वासाने परीक्षा द्यावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# अवैधरीत्या देशी दारू विकणाऱ्यास पकडले

## मौजे रुई येथे घरात छापा मारून देशी दारूच्या चाळीस बाटल्या पकडल्या

*** लक्ष्मीकांत मुंडे**
**आत्ताच एक्सप्रेस**

**श्रीक्षेत्र माहूर –** पोलीस उपमाहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या ऑपरेशन फ्लॅश आउट अंतर्गत हातभट्टी दारू विक्री अवैधरित्या देशी दारू विक्री अवैध धंद्याविरुद्ध धडक मोहीम राबविण्याचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी दिल्याने पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या धडाकेबाज कारवाया सुरू असून त्या अंतर्गत मौजे रुई येथील एका घरात छापा मारून देशी दारूच्या अवैधरित्या विक्रीसाठी ठेवलेल्या चाळीस बाटल्या जप्त केल्याची घटना दि १७ रोजी रात्री ९.०० वाजता घडली आहे

पोलीस निरीक्षक देविदास चोपडे हे स्वतः अधिकारी कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन शासकीय वाहनाद्वारे पेट्रोलिंग करत असताना गुप्त माहिती मिळाल्याने



एक नागरिक रुई येथे आपल्या राहते घरी देशी दारु बॉबी संत्राचे बॉटल्या बाळगुन तिची चोरटी विक्री करीत आहे, अशी माहिती मिळाल्यावरुन ६:३० वा. चे सुमारास छापा मारला असता सदर ठिकाणी एक इसम आपल्या घरासमोर मिळुन आला, त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव खंडु लोडबाजी धबडगांवकर वय ४४ वर्ष व्यवसाय मजुरी रा. रुई ता.माहुर जि. नांदेड असे असल्याचे सांगितले दोन पंचासमक्ष सदरील इसमाच्या घराची घरझडती घेतली असता घरामध्ये उत्तर कोपऱ्यालगत भिंतीच्या बाजुला एक प्लास्टीक व त्यामध्ये देशी दारु बॉबी संत्राचे ९० एम एल क्षमतेच्या एकुण ८० बॉटल्या प्रती बाटलीची किमत ४०/-रु देशी दारू बाटल्यांचा ३२०० रु चा माल मिळून आला.बेकायदेशीर व विनापरवाना आपल्या ताब्यात देशी दारु बॉबी संत्राचे ९० एम एल क्षमतेचे एकुण ८० बॉटल्या किमती ३२००/-रु.चा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने जवळ बाळगुन मिळुन आला म्हणून सदर आरोपी विरुध्द गुन्हा कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा प्रमाणे पो का पवन राऊत यांनी फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि बाबू जाधव पो हे का प्रकाश गेडाम होमगार्ड सलमान खान राहुल राठोड दिलीप जाधव हे करत आहेत.

# वसुली फंटरांच्या गळ्यात महाराष्ट्र शासनाची लेस, कृषी विभाग संशयाच्या भोवऱ्यात ?

**आत्ताच एक्सप्रेस**

**माहूर –** तालुक्यात कृषी विभागामध्ये सध्या गंभीर प्रकार घडत असल्याची चर्चा सर्वत्र रंगू लागली आहे. कृषी विभागातील बहुतांश अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी वास्तव्यास राहण्यास टाळाटाळ करत असल्याची बाब आधीच शेतकऱ्यांच्या नाराजीचा विषय ठरली आहे. मात्र आता त्याहून गंभीर बाब समोर येत आहे काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सावलीगत सोबत फिरणारे तथाकथित 'फंटर' हे चक्क गळ्यात महाराष्ट्र शासन अशी लेस लावून अधिकृत कर्मचाऱ्यांप्रमाणे वावरताना दिसत असल्याने चर्चेचा विषय ठरत असला तरी तो फंटर तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचा कि पंचायत समिती कृषी विभागाचा असा ही प्रश्न उपस्थित केला जात आहे

तालुक्यात हे फंटर कधी कृषी सेवा केंद्रांमध्ये, तर कधी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन उपस्थित राहत असल्याचे हि चर्चेतुन ऐकवण्यात येत आहे. त्यामुळे सामान्य व शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.शासनाची अधिकृत ओळख दर्शविणारी लेस परिधान करून अशा व्यक्तींची वावर ही अत्यंत गंभीर बाब आहे. हा प्रकार शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा, दबाव टाकण्याचा किंवा संभाव्य वसुलीचा प्रयत्न तर नाही ना ? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे. जर या व्यक्तींना अधिकृत अधिकार नसतील, तर त्यांना शासनाची ओळख वापरण्याची परवानगी दिली कोणी ? तर संबंधित अधिकाऱ्यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक असताना ते अनुपस्थित का ? शासनाची लेस वापरणाऱ्या व्यक्तींची ओळख आणि नियुक्ती काय ? शेतकऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची अनधिकृत वसुली होत आहे का ? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत असल्याने तालुक्यात होणाऱ्या चर्चेच्या अनुषंगाने संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करून सत्य परिस्थिती बाहेर आणावे संबंधितांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# आद्य क्रांतिकारक वस्ताद लहुजी साळवे यांची पुण्यतिथी साजरी



**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट –** किनवट शहरात आद्यक्रांतीवीर वस्ताद लहुजी साळवे यांची पुण्यतिथी साजरी करुन अभिवादन करण्यात आले याप्रसंगी नगरसेवक मारोती मुनेश्वर,प्रहार क्रांती दिव्यांग संघटनेचे तालुकाध्यक्ष भगवान मारपवार,नगरसेवक राम नेम्मानीवार, नगरसेवक अनवर मिर्झा, शिवसेना शहर प्रमुख प्रशांतभाऊ कोंरडे,मातंग समाज संघटना अध्यक्ष गंगाधर मुकनेपेल्लीवार,साई तिरमनवार,राजु जोशी,रमेश राशर्लावार,नागनाथ भालेराव,माधव खेडेकर,रविकुमार दिसलवार,किशोर देवतळे,रवि उपरवार,प्रेस रिपोर्टर उल्हास आडे, विशाल कलगोटूवार,माजी नगरसेवक लक्ष्मीपती दोनपेल्लीवार,अशोक आरपेल्लीवार,देवन्ना कात्तेरवार, संतोष मारपवार,सुशांत राशर्लावार,चिन्ना माहूरकर, विकास मंत्रीवार,प्रफूल्ल इंगोले,आरुष माहूरकर, श्रेयश सावनपेल्लीवार,व्यंकटेश गायकवाड, महेश भालेराव,पवन माहूरकर,परमेश्वर मोकेनवार,लकी कोरलटवार,आयुष माहूरकर व अश्वित माहूरकर आदी उपस्थित होते.

# नांदेडच्या मातीतून उभा राहिलेला सेवायज्ञ दिलीपभाऊ ठाकूरांचा गौरव सोहळा

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड–** सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती, नांदेड यांच्या वतीने यंदाच्या शिवजन्मोत्सवानिमित्त धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांना प्रतिष्ठेचा ''शिवधर्म सेवा श्री पुरस्कार'' प्रदान करण्यात येणार असल्याची अधिकृत घोषणा समितीचे पदाधिकारी भास्करराव हंबर्डे, अनिल धामणे पाटील आणि श्रीदेवी पाटील यांनी केली आहे. धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांना हा १०९ वा पुरस्कार मिळत असल्याने त्यांच्या कार्याची दखल राज्यभर घेतली जात आहे.

दि. १९ फेब्रुवारी, शिवजन्मोत्सवाच्या पवित्र दिवशी सकाळी ११ वाजता वैद्य हॉस्पिटलसमोरील भव्य पेंडॉलमध्ये हा गौरव सोहळा संपन्न होणार आहे. या सोहळ्यास शहरातील विविध सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती अपेक्षित आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या दिवशी समाजकार्यातील उल्लेखनीय कार्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात येत असल्याने या गौरवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा प्रसार, हिंदवी स्वराज्याच्या तत्त्वांची जपणूक आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याची परंपरा समितीने जपली आहे.

**१०९ वा पुरस्कार कार्याचा गौरव**

ॲड. दिलीप ठाकूर यांनी २२ वर्षांत १५ लाखांहून अधिक जेवणाचे डबे गरजूंना वाटून समाजसेवेत अद्वितीय असे कार्य करून दाखवले आहे! प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी रस्त्यावर आयुष्य कंठणाऱ्या, बेसहारा, असहाय, दुर्बल व मानसिक संतुलन गमावलेल्या लोकांना एकत्र करून, त्यांची केस-दाढी कटिंग करणे, स्वच्छ पाण्याने अंघोळ घालणे, नवीन कपडे देणे आणि १०० रुपयांचे बक्षीस देणे हे कार्य गेल्या ७२ महिन्यांपासून अविरत सुरू आहे. गेल्या ७ वर्षांपासून प्रत्येक हिवाळ्यात सलग ४० रात्री रस्त्यांवर झोपणाऱ्या बेघर लोकांना १४००० पेक्षा जास्त उबदार चादरी वाटण्यात आल्या आहेत. पावसाळ्यात ''कृपाछत्र'' उपक्रमांतर्गत गेल्या ७ वर्षांत १४,००० हून अधिक छत्र्या वितरित करण्यात आल्या आहेत.''चरण सेवा'' उपक्रमाअंतर्गत उन्हाळ्यात नंगे पाय चालणाऱ्या लोकांना १४००० चप्पलांचे वितरण करण्यात आले .



नांदेड शहरात अन्न वाया जाऊ नये आणि कोणीही उपाशी राहू नये म्हणून त्यांनी ४ वर्षांपूर्वी ''भाऊचा मानवता फ्रिज'' सुरू केला. या फ्रिजमध्ये दररोज किमान ४० ते १२० जेवणाचे डबे ठेवले जातात, जे गरजूंनी घेऊन आपली भूक भागवली जाते. अशा अनेक सामाजिक उपक्रमांचे आयोजन दिलीपभाऊ सतत करत असतात.

सामाजिक कार्यांसोबतच ते धार्मिक कार्यांमध्येही अग्रेसर आहेत.त्यांनी सत्यगणपती, औंढा नागनाथ, श्री क्षेत्र माहूर, रत्नेश्वरी यांसारख्या अनेक पदयात्रांचे आयोजन करून लोकांमध्ये धर्माविषयी आणि आरोग्याविषयी जागृती निर्माण केली आहे.''ना नफा ना तोटा '' या तत्त्वावर २६ वर्षांपासून दरवर्षी अमरनाथ यात्रेचे आयोजन करत असून, त्यांनी शेकडो ज्येष्ठ नागरिकांना कठीण अमरनाथ यात्रा करून दिली आहे. २५ वर्षांपासून त्रिपुरारी पौर्णिमेला दरवर्षी हजारो महिला हरिद्वार-वाराणसीच्या धर्तीवर नांदेडमध्ये आयोजित ''गोदावरी गंगा पूजा'' कार्यक्रमात सहभागी होतात. गेल्या ३६ वर्षांपासून ते एसटी कर्मचारी गणेश मंडळाला दरवर्षी गणपतीची मूर्ती देत आहेत. त्यांच्या संग्रही देशभरातून आणलेल्या ५०० हून अधिक गणेश मूर्तींचा संग्रह आहे.

नांदेडमध्ये त्यांनी स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, विविध खेळ स्पर्धा, निबंध स्पर्धा, भाषण स्पर्धा अशा ९० पेक्षा अधिक उपक्रमांचे दरवर्षी आयोजन करत आहेत .शालेय साहित्य वाटप, आरोग्य तपासणी शिबिर, मोफत औषध वाटप हे कार्य ते गेली ४० वर्षे नियमित करत आहेत.कोरोना काळात बाहेरगावाहून आलेल्या विद्यार्थ्यांना घरोघरी जाऊन जेवणाचे डबे वाटले.

अशा समाजसेवेच्या कार्यासाठी त्यांना आतापर्यंत देश-विदेशातून १०८ पुरस्कार प्राप्त झाले आहेत. अशा विविध पद्धतीने समाजसेवा करणारा संपूर्ण भारतात दिलीप भाऊंसारखा दुसरा कोणी सापडणे कठीण असल्यामुळे समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, ''शिवधर्म सेवा श्री पुरस्कार'' हा केवळ सन्मान नसून समाजकार्यासाठी प्रेरणादायी ठरणारा मानाचा किताब आहे. ॲड. दिलीप ठाकूर यांचे कार्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शांशी सुसंगत असून त्यांच्या योगदानाचा गौरव करणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.''या घोषणेनंतर विविध सामाजिक संघटनांकडून ॲड. दिलीप ठाकूर यांचे अभिनंदन करण्यात येत असून शिवजन्मोत्सवाच्या दिवशी होणाऱ्या या गौरव सोहळ्याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813